(71)

डाटा एन्ट्री करताना मराठी पर्यायाला
प्राधान्य देणेबाबत

महाराष्ट्र शासन

माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग

परिपत्रक क्रमांकः मातंसं २०१३/प्र. क्र.३१/३९

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ६ फेब्रुवारी, २०१३

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः ई-प्रशासन धोरण शासन निर्णय क्र. मातंसं २०११/प्र.क्र.१२५/३९ दि. २३/०९/२०११

२) शासन निर्णय क्रमांकः देवनागरी लिपी व वर्णमाला अद्ययावत करणेबाबत शासन निर्णय क्र. मभावा २००४/(प्र.क्र.२५/२००४)/२०-ब दि. ०६ नोव्हेंबर, २००९

परिपत्रक :-

महाराष्ट्र शासनाने ई-प्रशासन धोरण जाहीर केले असून या धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. आज्ञावली तयार करताना बहूतांश ॲप्लीकेशन द्विभाषी (Billingual) पद्धतीने तयार करण्यात येतात. यामध्ये व्यक्तींची नावे, पत्ता इत्यादी माहिती भरण्यात येते. मात्र, असे आढळून आले आहे की, सदर माहिती भरताना डाटा एन्ट्री ऑपरेटर प्रथम इंग्रजीमधील नाव व पत्ता टंकलिखित करतात. त्यानंतर गुगल अथवा सिडॅक ट्रान्सलिटरेशनचा वापर करुन हा डाटा मराठीत अनुवादीत करण्यात येतो. असे करीत असताना असंख्य चुका होत असल्याचे निदर्शनास आले आहे. शासकीय ॲप्लिकेशन

तयार करताना मराठीला प्रथम भाषा म्हणून प्राधान्य देण्यात यावे याअनुषंगाने Billingual Database मध्ये मराठी शब्दांची माहिती १००% अचूक असावी याकरिता पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) शासनाच्या विभागामध्ये अथवा जिल्हा व तालुका स्तरावरील शासकीय कार्यालयांमध्ये विविध कामांसाठी डाटा एन्ट्री ऑपरेटर नियुक्त करताना मराठीचे उत्तम ज्ञान असणाऱ्या उमेदवारांना प्राथमिकता देण्यात यावी.

२) बायलिंग्वल डाटाबेसमध्ये डाटा एन्ट्री करीत असताना प्रथम मराठी नाव व पत्ता इत्यादींची माहिती भरण्यात यावी. त्यानंतर तो डाटा इंग्रजीमध्ये अनुवादित करण्यात यावा. आवश्यकता भासल्यास इंग्रजी डाटा नव्याने भरण्यात यावा. जेणेकरुन डाटा एन्ट्री ऑपरेटरचे मराठी कौशल्य वाढीस लागेल. फक्त इंग्रजीमध्ये डाटा एन्ट्रीचा पर्याय उपलब्ध नसावा. तसेच इंग्रजी ते मराठी अनुवादीत देखील पर्याय उपलब्ध नसावा.

३) डाटा एन्ट्री करण्यासाठी केवळ इनस्क्रिप्ट की बोर्डचाच वापर करण्यात यावा.

४) ॲप्लिकेशन विकसित करताना डेव्हलपरने इनस्क्रिप्ट की बोर्डचा वापर करावा. तसेच ज्या ठिकाणी डाटा एन्ट्री संबंधीत विभागीय कर्मचारी अथवा महा-ई-सेवा केंद्र (CSC) वा संग्रामच्या ऑपरेटर यांचेकडून करण्यात येणार आहे अशा ठिकाणीसुद्धा डाटा एन्ट्री करताना इनस्क्रिप्ट की बोर्डचा वापर अनिवार्य करण्यात यावा.

५) देवनागरी लिपी व वर्णमाला अद्ययावत करणेबाबतचा शासन निर्णय क्र. मभावा २००४/(प्र.क्र.२५/२००४)/२०-ब दि. ६ नोव्हेंबर, २००९ चे पालन करण्यात यावे. या शासन निर्णयाच्या च्या अनुषंगाने विकसित केलेले सकल मराठी किंवा लोहित मराठी सारख्या फॉन्टचा वापर करण्यात यावा.

६) मात्र सर्व सामान्य नागरिकांकडून डाटा एन्ट्री होणार असेल तर त्यांचेकरिता सर्व पर्याय खुले ठेवावेत. परंतु इनस्क्रिप्ट किबोर्डचा Default पर्याय देण्यात यावा. तसेच सॉफ्ट इनस्क्रिप्ट किबोर्डची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

७) युनीकोड संज्ञा ही संगणकीय आज्ञावलीमध्ये देवनागरी अंक ० ते ९ हे चिन्हे म्हणून ग्राह्य मानते, त्यामुळे ० ते ९ या अंकांची डाटा एन्ट्री करतांना रोमन अरेबिक न्युमरल चा वापर करावा, परंतु आज्ञावलीत दर्शवताना किंवा प्रिंट घेताना हे अंक शासनाच्या क्रमांक ५ मध्ये उल्लेखित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे असावेत.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१३०२०६११५५१६६२११ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Aggarwal Rajesh Madanlal

Digitally signed by Aggarwal Rajesh Madanlal
DN: CN = Aggarwal Rajesh Madanlal, C = IN, S = Maharashtra, O = Govt of Maharashtra, OU = Directorate of Information Technology
Reason: I am approving this document
Date: 2013.02.07 18:10:11 +05'30'

**(राजेश अग्रवाल)**

**सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव,

२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,

३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,

४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

५) मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव,

६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव

७) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई,

८) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,

(74)



९) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
११) सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
१२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई)
१३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र, नागपूर)
१४) महालेखापाल, (लेखा परीक्षा , महाराष्ट्र, मुंबई )
१५) महालेखापाल, लेखापरीक्षा महाराष्ट्र, नागपूर
१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई व नागपूर
१७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९) सर्व पोलीस आयुक्त
२०) सर्व विभागीय आयुक्त,
२१) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२२) सर्व जिल्हाधिकारी,
२३) सर्व जिल्हा परिषद / नगरपालिकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२४) सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी
२५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,
२६) पहिला मजला, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण इमारत,
२७) सर्व मंत्रालयीन विभाग
२८) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण, मुंबई
२९) मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
३०) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३१) निवड नस्ती (२ प्रती)